|| आत्मा मालिक ||



ध्यान म्हणजे निःशब्द
ज्ञानाचा अभ्यास


निःशब्द ज्ञान
म्हणजे आत्मज्ञान


आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक
||ॐ गुरुदेव||

# आत्मा मालिक

मे -२०२४

॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २३ वे अंक ५ वा मे २०२४ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - आत्म्याचा शोध - संत परमानंद महाराज ४

हरिपाठाच्या गाभाऱ्यात-२ योग याग विधी येणे नोहे सिद्धी! - नामदेव सदावर्ते ६

निष्ठावंत भाव, भक्तांचा स्वधर्म -बंडोपंत कुलकर्णी ११

मुक्ताईच्या आसवांना सोहंभावी शीतलता - डॉ. सुनील शिंदे १५

सृष्टी विज्ञान आणि आध्यात्मिक दृष्टिकोन -बी. के. गायकवाड १७

सौभाग्य - नीता यादव २०

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## आत्म्याचा शोध

**संपादकीय**

आजच्या समाजात मान्य असलेली आत्मकल्पना ही भगवद्गीतेतील आहे. देहापासून आत्मा अत्यंत भिन्न आहे. आत्म्याला मरण नाही. जुनी वस्त्रे टाकून देऊन ज्याप्रमाणे आपण नवी परिधान करतो, त्याप्रमाणे देहनाशानंतर आत्मा नवीन देह धारण करतो. आत्म्याला शस्त्रे तोडीत नाहीत, अग्नी जाळीत नाही आणि पाणी भिजवीत नाही. त्याला कोणी निर्माण केले नाही, त्याच्यात कोणतेही विकार घडत नाहीत आणि त्याचा नाशही होऊ शकत नाही. इंद्रियद्वारा त्याचे स्वरूप कळणार नाही, कारण तो जड नाही. अशा तऱ्हेची गीतेतील आत्मकल्पना आहे.

**-संत परमानंद महाराज**

**आ**त्मा हा शब्द 'अत्' (सतत चालत राहणे) अथवा 'अप्' (व्याप्त होणे) या धातूंपासून बनला आहे, असे निरुक्तात म्हटले आहे.

मराठी विश्वकोशात याबाबत सविस्तर लिहिले आहे. प्राचीन मानवाची अशी श्रद्धा होती, की प्रत्येक मनुष्याच्या जीवनव्यापारांचे नियंत्रण करणारी एक शक्ती त्या त्या मनुष्याच्या ठिकाणी असते. ही शक्ती म्हणजे भौतिक दृष्टीस दिसणाऱ्या त्या व्यक्तिचेच एक सूक्ष्म रूप होय, अशी कल्पना होती. स्वतःचे पाण्यात दिसणारे प्रतिबिंब, मृत व्यक्तीचे स्वप्नात घडणारे दर्शन, दृष्टिभ्रमाने डोळ्यांसमोर भासणारी एखादी पुसट आकृती, अशांसारख्या घटनांनी व्यक्तीच्या अंतर्यामी असणाऱ्या प्रतिव्यक्तीच्या कल्पनेला पुष्टी मिळे. ही प्रतिव्यक्तीची कल्पना म्हणजेच मानवेतिहासात आत्मा या संकल्पनेची सुरुवात होय. व्यक्तीचा आत्मा त्या सबंध व्यक्तीला व्यापून असतो या अर्थाने 'अप्' = व्याप्त होणे या धातूपासून त्याची व्युत्पत्ती सांगणे योग्यच ठरते. तसेच व्यक्तीच्या प्रत्येक कृतीचा प्रेरक या अर्थाने तो सतत गतिमान असतो. या दृष्टीने 'अत्'= सतत चालणे या धातूपासून सिद्ध केलेली व्युत्पत्तीही समर्पक मानता येते. मृत्युसमयी आत्मतत्त्व मनुष्याला सोडून जाते अशी कल्पना करणे तर्कसंगत आहे. मृत्यूनंतर श्वासोच्छ्वास थांबतो किंबहुना शेवटचा श्वास सोडणे म्हणजेच मृत्यू होय, हीही गोष्ट स्पष्ट आहे. यावरून व्यक्तीला व्यापून राहणारा आत्मा हा श्वसन-वायुरूप आहे अशी कल्पना होऊ शकते. या कल्पनेचे प्रतिबिंब आपल्याकडील प्राण शब्दांशी दिसते. प्र+अन् (श्वासोच्छ्वास करणे) या धातूपासून प्राण शब्द बनला आहे. म्हणून अन् या धातूचा संबंध 'आत्मन्' या शब्दाशी असू शकतो. श्वास (वायुदेवतेचा) या अर्थाने ऋग्वेदात आत्मन् हा शब्द चार वेळा आलेला आहे.

देहाच्या अंतर्यामी राहून त्याचे नियंत्रण करणारे असे देहभिन्न आत्मतत्त्व आहे, या संकल्पनेला काही तार्किक कार्यही आहे. व्यक्तीजीवनात एकसारखे विकार घडत असतात, तरी व्यक्ती ही तीच राहते. विकार घडत असताना काहीतरी अविकृत अथवा नित्य असे असतेच, अशी आपली धारणा असते. त्या नित्य तत्त्वाचा निर्देश आत्मा याने होतो. तसेच व्यक्तीचा अनुभव बहुमुखी असतो. सुख आणि दुःख, पाहणे आणि ऐकणे, प्रेम आणि द्वेष अशा तऱ्हेचे अनुभव अनेक असले, तरी ते अनुभव

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

घेणारी व्यक्ती एकच असते. अनेक अनुभवांत अनुस्यूत असणारी ही एकता आत्मा या संकल्पनेने व्यक्त केली जाते.

आत्मा म्हणजे द्रव्य असा अर्थ होत असला, तरी तो गौण होय. त्याचा मुख्य अर्थ देहभिन्न असा 'मी' अथवा 'अहं' पदार्थ हाच होय. असा एक पक्ष घेता येतो, की कोणताही अनुभव येत असताना मला माझ्या 'अहं'चा अथवा आत्म्याचा प्रत्यय येत असतो व ज्याला हा अनुभव येतो, तोही 'अहं' अथवा 'मी' होय. सर्व अनुभवांचे अधिष्ठान असा जो मी अथवा माझा आत्मा, त्याचे स्वरूप काय यासंबंधीची मीमांसा करण्याचा प्रयत्न फार प्राचीन काळापासून माणसाने केला आहे.

उपनिषदांचा यासंबंधीचा प्रातिनिधिक विचार असा आहे, की आत्म्याला जन्मही नाही व नाशही नाही. तो निरवयव, क्रियाहीन, निर्गुण व बोधरूप आहे. जड विश्वाच्या अंतर्यामीही तेच आत्मतत्त्व आहे. आपला आत्मा विश्वात्म्याशी एकरूप आहे, हा अनुभव घेतल्याने अमृतत्व मिळते, अशा तऱ्हेच्या प्रगल्भ आत्मविचाराबरोबर उपनिषदांत तो पुरुष (आत्मा) अंगठ्याएवढा आहे किंवा तो डोळ्यांच्या बुबुळांत राहतो, अशा तऱ्हेच्या आत्मस्वरूपासंबंधी अगदी प्राथमिक कल्पनाही आढळतात.

न्याय व वैशेषिक या दर्शनांतून जीवात्मा विभू म्हणजे सर्वत्र, सर्वकाली असणारा असा मानला आहे. ज्ञान अथवा बुद्धी हा आत्म्याचा गुण आहे, स्वरूप नव्हे. नैयायिक हे आत्म्याचे मानसप्रत्यक्ष होते असे मानतात, तर वैशेषिकांच्या मते त्याचे अस्तित्व अनुमानाने समजते. बुद्धी हा गुण ज्या अर्थी प्रत्यक्षात उपलब्ध आहे, त्या अर्थी त्या गुणाला आश्रय असणारे आत्मा हे द्रव्य असले पाहिजे, असे ते अनुमान आहे. ज्ञानरहित अवस्थेत, आत्मा असू शकतो किंबहुना असा जाणीवरहित आत्मा हा काष्ठपाषाणाप्रमाणे जडच होय, तो आत्मा नसून अनात्माच होय, असा आक्षेप नैयायिकांच्या आत्मकल्पनेवर घेतला जातो.

सांख्य आणि योग या दर्शनांतून आत्म्याला 'पुरुष' अशी संज्ञा आहे. पुरुषात कोणतेही विकार घडत नाहीत. ज्ञानप्रक्रिया जड अंतःकरणात घडते, त्या प्रक्रियेचा पुरुष केवळ साक्षी असतो. तो तटस्थपणे पाहतो. कोणत्याही तऱ्हेचे कर्तृत्व त्याला नाही. सुखदुःखांचे भोग हेही वास्तविक जड प्रकृतीचेच. पुरुष निर्लेप, उदासीन आणि केवल आहे. हा केवलपणा उमगणे म्हणजेच कैवल्य अथवा मोक्ष होय.

आजच्या समाजात मान्य असलेली आत्मकल्पना ही भगवद्गीतेतील आहे. देहापासून आत्मा अत्यंत भिन्न आहे. आत्म्याला मरण नाही. जुनी वस्त्रे टाकून देऊन ज्याप्रमाणे आपण नवी परिधान करतो, त्याप्रमाणे देहनाशानंतर आत्मा नवीन देह धारण करतो. आत्म्याला शस्त्रे तोडीत नाहीत, अग्नी जाळीत नाही आणि पाणी भिजवीत नाही. त्याला कोणी निर्माण केले नाही, त्याच्यात कोणतेही विकार घडत नाहीत आणि त्याचा नाशही होऊ शकत नाही. इंद्रियद्वारा त्याचे स्वरूप कळणार नाही, कारण तो जड नाही. अशा तऱ्हेची गीतेतील आत्मकल्पना आहे. या आत्म्याचे ध्यान केल्यास त्याच्या माध्यमातून मुक्ती मिळू शकते, असे सद्गुरू सांगतात. म्हणून प्रत्येकाने या आत्मचिंतन करून आपल्या मोक्षपदाची वाट सुकर करून घ्यावी.

||आत्मा मालिक||

**- संत परमानंद महाराज**
संपादक

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



हरिपाठाच्या गाभाऱ्यात-२

## योग याग विधी येणे नोहे सिद्धी!

साधकाला साधुसंत, सद्‌गुरूंकडून बोध मिळाल्यावर त्यांच्या उपदेशामुळे आलेला अनुभव जागच्या जागीच संपतो. साधकाचे अज्ञान-अविद्या सद्‌गुरूंच्या उपदेशाने नष्ट होते. त्यानंतर ज्ञान उत्पन्न होते. ते ज्ञानही जेव्हा लोप पावते, तेव्हा आत्मज्ञानाचा उदय होतो. जशी कापुराची वात अग्नीच्या ज्योतीने उजळते व ज्योतीचीही 'ठायीच समाप्ती' होते. तेथे मग कापूर, ज्योत व राखही शिल्लक राहत नाही. तसेच साधुच्या उपदेशामुळे अंकित साधकाच्या अविद्या व विद्येची निवृत्ती होऊन मोक्षप्राप्ती होते. तो साधक आत्मा मालिक बनून आत्मानंदी सदा लीन राहतो. म्हणून संत ज्ञानराज म्हणतात- संत संगतीची मला आवड असल्याने मला सर्वत्र आत्मतत्वरूपी श्रीहरी दिसत आहे.

-नामदेव सदावर्ते

**म**नामध्ये भगवंताविषयी प्रेम, श्रद्धा व भक्ती नसताना केवळ हरी मुखे म्हणून आत्मज्ञान प्राप्त होणार नाही. अंगी बळ नसताना फक्त शक्ती असल्याचा देखावा करून बळ सिद्ध होणार नाही. ज्ञानराज म्हणतात-

**भावेवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति।**
**बळेवीण शक्ति बोलू नये।।**

भाव, श्रद्धा, प्रेम नसताना कृत्रिमपणे देवपूजा, उपासना विधी, ग्रंथ पारायण, नामस्मरण करणे म्हणजे कर्मकांड मानावे. हीच अंधश्रद्धा होय. बालकाने कळवळून आईला हाक मारावी आणि आईने धावत येऊन बालकास पोटाशी धरावे, तशी कळवळून हाक मारणे म्हणजे प्रेमभक्ती. भक्ताने प्रेमभावाने केलेल्या नामस्मरणाबरोबर देव धावून आल्याचे अनेक दाखले पुराणांतरी आहेत. गजेंद्र मोक्षाची कथा प्रेमभक्तीचे आदर्श उदाहरण आहे. 'हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा' ही नामभक्तीची प्रथम पायरी आहे. भावेवीण भक्ती करू नका, असे ज्ञानराज सुचवितात. नामस्मरण हे अंधश्रद्धा ठरू नये यासाठी मनी प्रेमभाव असावा, एकनिष्ठा असावी आणि अखंड नामस्मरणातून भक्तिभाव, संपन्नता व निष्ठा उत्पन्न होते. हरिपाठात कुठेही अंधश्रद्धेला थारा नाही. त्यासाठी संतांनी आचारसंहिता सांगितली आहे. प्रेमाशिवाय भजन, नाकाशिवाय मोती, अर्थाशिवाय पोथी वाचणे व्यर्थ होय. प्रेमावीण श्रुती-स्मृतींचे ज्ञान, प्रेमावीण ध्यान-पूजन, प्रेमाशिवाय कीर्तन-प्रवचन श्रवण व्यर्थ होय. श्रीहरीच्या ठायी दृढ भाव असावा. मनात परमेश्वराविषयी एकनिष्ठ भक्ती असावी. भक्ती नसेल तर मुक्तिची वायफळ बडबड करू नये असे संतांनी सांगितले आहे. देव चटकन आणि सहजपणे कसा प्रसन्न होईल? त्यासाठी एकाग्र राहून शांत मनाने नामस्मरण करावे. इतर साधनोपासनांची व्यर्थ खटपट करू नका, असे ज्ञानराज सांगतात.

श्रद्धा म्हणजे तरी काय? आपण सन्मार्गाने चालत असताना ज्या ज्या प्रसंगी दुःखे, संकटे प्राप्त होतील, ती सर्व देवाची कृपा समजून पुढेपुढे चालत राहणे, यालाच श्रद्धा म्हणतात. द्रव्यप्राप्तीसाठी, मान-सन्मानासाठी, विषयवासनेच्या पूर्तीसाठी संसारी जीव अनेक प्रकारची खटपट करतात. अशा संसारी जीवांनी झडझडोनि उठोन भक्तिमार्गाच्या वाटेवर प्रवास करावा. त्यासाठी पहिले पाऊल टाकणे म्हणजे

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

हरिनामस्मरण करणे. ज्ञानराज सांगतात-

**ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे।**
**तुटेल धरणे प्रपंचाचे ।।**

अष्टांगयोग व यज्ञ याचे यथाविधी आचरण केल्यानेही हरिची प्राप्ती होणार नाही. कारण ही सर्व साधने फसवणूक करणारी आहेत. योग-याग विधीने खरा परमार्थ साध्य होत नाही. त्यामुळे फक्त दांभिकपणा निर्माण होतो. म्हणून त्या व्यर्थ उपाधी ठरतात. प्रेमभावाशिवाय देव कळणार नाही. तसेच सद्गुरुवाचून परमार्थमार्गावरील अनुभवही कळणार नाही. तपावाचून दैवत प्रसन्न होणार नाही. तसेच कर्माशिवाय फळ मिळणार नाही. आपल्याविषयी प्रेम असल्याशिवाय कोणी आपल्याला हिताची गोष्ट सांगणार नाही. सर्व जीवांना संसारसागर तरून जाण्यासाठी साधुची, संतांची, सद्गुरूंची संगत आवश्यक असते.

भक्ती म्हणजे नुसते कर्मकांड नव्हे. त्याला प्रेमभावाची जोड हवी. योग म्हणजे अष्टांग योग. याग म्हणजे वेदात सांगितलेले नाना प्रकारचे यज्ञ, तसेच कर्मकांडात्मक विधी यांचे आचरण करणे व्यर्थ आहे, असे संत ज्ञानेश्वर महाराज स्पष्टपणे सांगतात.

**योगयाग विधी, येणे नोहे सिद्धी।**
**वायाचि उपाधी दंभ धर्म।।**

योग-याग-विधी आचरणाने दंभ अहंकार वाढतो. योगमार्गाने हातून चमत्कार घडतात. त्यामुळे जनलोकांत मानसन्मान मिळतो. पण लोकांना भुलविणे म्हणजे परमार्थ नाही. त्यामुळे साधकाचा पुण्यक्षय होऊन तो खऱ्या परमार्थापासून दूर जातो. त्याच्या हातून प्रमाद घडतात. त्यामुळे तो समाजात दोषी, गुन्हेगार ठरतो. व त्यास शासनही घडते.

**साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला।**
**ठायीच मुराला अनुभव ।।**

साधकाला साधुसंत, सद्गुरूंकडून बोध मिळाल्यावर त्यांच्या उपदेशामुळे आलेला अनुभव जागच्या जागीच संपतो. साधकाचे अज्ञान-अविद्या सद्गुरूंच्या उपदेशाने नष्ट होते. त्यानंतर ज्ञान उत्पन्न होते. ते ज्ञानही जेव्हा लोप पावते, तेव्हा आत्मज्ञानाचा उदय होतो. जशी कापुराची वात अग्नीच्या ज्योतीने उजळते व ज्योतीचीही 'ठायीच समाप्ती' होते. तेथे मग कापूर, ज्योत व राखही शिल्लक राहत नाही. तसेच साधुच्या उपदेशामुळे अंकित साधकाच्या अविद्या व विद्येची निवृत्ती होऊन मोक्षप्राप्ती होते. तो साधक आत्मा मालिक बनून आत्मानंदी सदा लीन राहतो. म्हणून संत ज्ञानराज म्हणतात- संत संगतीची मला आवड असल्याने मला सर्वत्र आत्मतत्वरूपी श्रीहरी दिसत आहे.

**ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी।**
**हरि दिसे जनी वनी आत्मतत्वी।।**

साधुच्या संगतीशिवाय जीवाचा उद्धार होत नाही. साधु म्हणजे सद्गुरु. तो आत्मज्ञानसंपन्न, दैवी गुणांचा पुतळा असावा. तरच तो शिष्य-साधकाला आत्मबोधाचा उपदेश देतो. कर्मकांडविधी करावयास सांगणारा यज्ञयागविधीची महती सांगून शिष्याची फसवणूक करणाऱ्या साधुकडून आत्मबोध मिळत नाही. ज्ञानराज म्हणतात माझ्या गुरुंनी मला संपूर्ण बोध दिला आहे. ज्ञानप्राप्ती झाल्यावर शिष्याचा देहभावही उरत नाही व ब्रह्मभावही शिल्लक राहत नाही. मोक्षाच्या सीमारेषेवर तो येतो. त्याला सर्वत्र आत्मबोधाचा साक्षात्कार होतो.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण।**

**दिधले संपूर्ण माझे हाती।।**

श्रीगुरूंनी दाखविलेल्या ज्ञानमार्गाने विवेकरूपी तीर्थाच्या तटावर येऊन तेथे त्या साधकाने आपल्या बुद्धिचा मळ धुवून टाकल्यावर त्याच्या मनी वैराग्य उत्पन्न होते. मन एकाग्र होते. त्यानंतर अखंड हरिनामस्मरण घडते. मी देह आहे असे म्हणणे हीच अविद्या व मी ब्रह्म आहे असे म्हणणे हे यथार्थ ज्ञान. हे ज्ञानसुद्धा अविद्याच असते. काट्याने काटा काढल्यानंतर अंगात घुसलेला काटा व तो ज्याने बाहेर काढला तो काटा. हे दोन्ही काटे फेकून द्यावे लागतात. तसे देहाभिमान व ब्रह्माभिमान दोन्ही अहंभाव सोडल्यावरच आत्मज्ञान प्राप्त होते. साधकाच्या वृत्तीत सद्‌गुरू ब्रह्माभिमान निर्माण करतात. तो ब्रह्मभाव सद्‌गुरुचरणी अर्पण करावा लागतो. साधुबोधानंतर शिष्याचे परमार्थजीवन समृद्ध होते. ज्ञानराज ज्ञानेश्वरीत सांगतात-

**मग आगी लागलिया कापूरा। ना काजळी ना वैश्वानरा।**

**उरणे नाही वीरा। जयापरी।। ज्ञा. १५/४३९**

जे पर्वताप्रमाणे मोठमोठी पापे करतात आणि हरिभक्तिविषयी विन्मुख राहतात, त्या अभक्तांची पापे अन्य उपायांनी नाहिशी होत नाहीत. ती तशीच राहतात. अगणित पातकांच्या गर्तेत बुडालेला हा करंटा की, ज्याला हरिची भक्ती नाही, तो पतीत बनतो. असा हा अभक्त हरिभजन कसे करील? तो एकसारखी सतत वायफळ बडबड करतो. मग त्यांना तो दयाळू हरी कसा प्राप्त होईल? ज्ञानराज सांगतात- या जगातील सर्व घटकांच्या ठिकाणी एकाच आत्म्याचे अधिष्ठान आहे.

जे हरिभजन करीत नाही असे पातकी लोक दैवहत, करंटे असतात. त्यांच्या संगतीत राहणाराही महापापी असतो. ते पंचमहापातक करतात, असे ते रसनाशिश्नाचे अंकित असूनही साधुच्या बाह्यवेषात ते फिरतात आणि लोक त्यांनाच साधुसंत मानतात. ते हरिनाम सोडून जनरंजक बडबड करतात. असे ते महापापी लोभासाठी, धनमानासाठी परमार्थ करून जनतेस लुबाडतात. संत एकनाथ महाराज म्हणतात-

**हरिनाम सांडोनि करंटी। मिथ्या करताती चावटी।**

**जेवी हगवणी पिटपिटी। तैशा गोष्टी जल्पती ।।। ए. भा. १९-१२२०**

हरिनामस्मरण, चिंतनाशिवाय आत्मानुभव मिळत नाही. ज्यांना आत्मानुभव झाला नाही, ते ङ्ख

**अनंत वाचाळ बरळती बरळ।**

**त्या कैसेनि गोपाळ । पावे हरी।।**

हरिनामस्मरण हा एकच उपाय आहे भगवद्‌प्राप्तीसाठी. म्हणून हरि मुखे म्हणा असे संत सांगतात. आपल्या मनोवृत्तीची धाव संतसंगतीकडे लाव. या साधनेने तू लक्ष्मीपतीस वश करून घे, म्हणजे संत ज्याप्रमाणे सांगतील तसे कायावाचामनाने वाग. हरिप्राप्तीचे हेच साधन आहे. वाचेने निरंतर रामकृष्ण नामाचा जय करणे हाच जीवाचा धर्म आहे. रामजप हा शिवाचाही आत्मा आहे. हरिनामोच्चार करणाऱ्यास द्वैतबंधनाची बाधा होत नाही. वैष्णवांना हरिनामस्मरणाने जीवन्मुक्तदशा प्राप्त होते. योग्यांना मिळणारे अद्वैतानुभवाचे सुख हरिनामामृत सेवनात आहे. बाळपणातच आसूर कुळातील असूनही प्रल्हादाच्या जिव्हेवर हरिनाम ठसा सद्‌गुरुकृपेने उमटला. तसेच श्रीकृष्णासारखा ज्ञानदाता सद्‌गुरू उद्धवाला लाभला. हरिनामस्मरण करणे हे पारमार्थिक साधन फार सोपे आहे. पण ते सर्वांना दुर्मिळ असून, ते क्वचित मानवास प्राप्त होते, असे ज्ञानदेव सांगतात.

**संतसंग धरा तुम्ही हरिभजन करा।**

**पाठी लागलासे काळ। दात खातो करकरा।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

ज्ञानराज सांगतात- संतांची जेव्हा भेट होते, तेव्हा मी त्याच्या स्वरुपात लीन होतो. त्याच्या चतुर्भुजांपैकी दोन भुजा स्थळात आणि दोन भुजा सूक्ष्मात आहेत.

**या संतांसी भेटता । हरे संसाराची व्यथा।**
**पुढता पुढती माथा। अखंडित या ठेवीन।।**
**या संतांचे देणे। कल्पतरुहुनि दुणे।**
**परिसा परीस अगाध देणे। चिंतामणी ठेंगणा।।**
**या संतापरीस उदार। त्रिभुवनी नाही थोर।**
**मायबाप सहोदर। इष्टमित्र सोईरे ।।**
**कृपाकटाक्षे न्याहाळिले। आपुले पदी बैसविले ।**
**बापरखुमादेविवरे विठ्ठले। भक्ता दिधले वरदान।। (ज्ञा. म. गाथा)**

ज्यांच्या अंगी दैवीगुणांचा समुच्चय आहे, त्यांना संत म्हणावे. आसुरी गुणांनी ज्यांचे जीवन व्याप्त आहे, त्यांना राक्षस म्हणतात. ज्यांची वृत्ती आसुरी असूनही जे संत असल्याचे ढोंग करतात, ते महापापी असतात. जे ज्ञाननिधीचे भुजंग, विषयदरींचे वाघ, रसनाशिश्नांचे अंकित अशा वृत्तीच्या लोकांनी बाह्यवेष संतांचा घेतल्यावर अशा ढोंगी लोकांना भोळे भाविक भूलतात व भावनेच्या आहारी जाऊन त्यांना संत, संतश्री, तपोनिधी, ह. भ. प. अशा विशेषणांनी संबोधून फसतात. संत कोण?-

**नाही संतपण मिळत हे हाटी। हिंडता कपाटी रानीवनी ।।**
**तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठली।।**
**नेणती काही टाणाटोणा। नामस्मरणावाचूनि ।।**

जे विरक्त आहे, जे विषयांचे गुलाम नाही, अशा संतांची ओळख संतवाङ्मयातूनच होते. गीता ही जशी भगवंताची वाङ्मयमूर्ती आहे, तशी ज्ञानेश्वरी ही ज्ञानराज माऊलींची वाङ्मयमूर्ती आहे. संत वाङ्मयातून संतांचे दर्शन घडते. संतच ज्ञान देऊ शकतात. आत्मज्ञान हवे असेल तर संतांनाच शरण जावे लागेल. त्यांचे दर्शन होताच आत्मबोध होईल. अन्यथा नाही.

**गुरू तेथे ज्ञान। ज्ञानी आत्मदर्शन।**
**दर्शनी समाधान। आथि जैसे ।।**

संतांच्या कृपादृष्टीने आपले चित्त स्थिर व शांत होते. संतांच्या मुखातून बाहेर पडलेले शब्द अमृतासमान असतात. संतांच्या संगतीनेच खरा परमार्थ कळतो. त्यांच्या संगतीने सद्ग्रंथांचे वाचन, चिंतन-चर्चा, प्रवचन-कीर्तन आदी लाभाच्या रुपाने आपले जीवन कृतार्थ होते.

हिरण्यकश्यपू या दैत्याच्या पोटी जन्माला येऊनही केवळ महर्षी नारद यांच्या उपदेश कृपेमुळे प्रल्हाद भगवंताचा लाडका भक्त ठरला. भगवंतांनी प्रल्हादासाठी नरसिंहाचा अवतार घेतला. तसेच कृष्णशिष्य उद्धवाला श्रीकृष्णासारखा ज्ञानदाता सद्गुरु भेटला. अखंड नामस्मरणाच्या उपासनेने नारदशिष्य प्रल्हाद व कृष्णशिष्य उद्धव हे पुराणप्रसिद्ध भक्त आहेत. त्यांच्या पुण्याची कोण बरोबरी करील. म्हणून हरी मुखे म्हणा.

श्रीविष्णूच्या नामस्मरणावाचून इतर जप करणारा आणि रामकृष्णस्वरूपी ज्याचे मन नाही त्याचे ज्ञान व्यर्थ आहे. जन्माला येऊन द्वैतभावरहित अद्वैत अशा परमात्म्याला जाणण्याचा मार्ग ज्यास माहीत नाही, तो करंटा, हतभागी होय. त्याची वसती रामकृष्णस्वरूपी कशी होईल? द्वैतभाव नाहिसा करून टाकणारी झाडणी गुरुप्रसादाशिवाय लाभत नाही. ज्ञान प्राप्त होत नाही. अशा माणसाचे मन नामस्मरणावर

कसे बरे केंद्रित होईल? म्हणून ईश्वराच्या सगुण रूपाचेच मी सतत ध्यान करतो. प्रपंचातील यातनामय, मायिक गोष्टींचे मौन धरले. त्याचा विचारही करू नये. असे संत सांगतात.

भगवंताच्या सगुणरूपाच्या नामस्मरणाच्या ठायी ज्याचे मन नाही तो कितीही ज्ञानी असला तरी त्याचे ते ज्ञान व्यर्थ आहे. चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणांचे पठण केलेले असेल व नामस्मरणात रस नसेल तर त्याचे ते अफाट ज्ञानही फुकट, निरर्थक, व्यर्थ आहे. कारण- संत तुकोबा म्हणतात-

**वेद अनंत बोलिला, अर्थ इतुकाचि शोधिला ।**
**विठोबासी शरण जावे। निजनिष्ठे नाम गावे।।**

हरिनामजपाशिवाय ज्ञान फलदायी होऊ शकत नाही. हरिभक्ती हीच ज्ञानोत्पादक व ज्ञानसंरक्षक आहे. कारण बुद्धिदाता श्रीविष्णूच आहे. अद्वैत परमात्म्याला न जाणता बाकी इतर ज्ञान, मानमान्यता सर्व व्यर्थ आहेत. तो सर्व कर्मकांड जाणतो, पुराणे मुखोद्‌गत, ज्योतिषशास्त्रात निपुण, पण श्रीहरि नामस्मरणाशिवाय ते ज्ञान निरुपयोगीच ठरते. ज्ञानराज सगुण ध्यानाचा पुरस्कार करतात.

**त्रिवेणी संगमी नाना तीर्थे भ्रमी।**
**चित्त नाही नामी तरी ते व्यर्थ।।**

हरिनामाकडे चित्त नाही आणि गंगा-यमुना-सरस्वती संगमस्थळी जातो अथवा अनेक तीर्थयात्रा करणेसुद्धा व्यर्थ मानावे. हरिनाम विन्मुख मनुष्य पापी होय. संकटकाळी त्याला हरिशिवाय कोण सोडण्यास धावणार आहे. भगवंतांच्या नामस्मरणाने अनेक पातकांतून त्रैलोक्याचा उद्धार होतो, असे वाल्मीकीने रामायणात सांगितले आहे. हरिनामजपाने सर्व वंशाचा उद्धार होतो. ज्ञानराज सांगतात-

**ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचे।**
**परंपरा त्याचे कुळ शुद्ध।।**

हरिपाठाच्या सुरुवातीस श्रीव्यासमहर्षींचा उल्लेख असून, या दहाव्या अभंगात ज्ञानराज महर्षी वाल्मीकीचा उल्लेख करून सांगतात-

**पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक।**
**नामे तिन्ही लोक उद्धरती।।**

जर एका हरिनामाची एवढी श्रेष्ठता असेल आणि ते जर एवढे सोपे, सुलभ, सहजसुंदर व सुखदायक असेल तर ज्ञान, तीर्थाटन, अन्य उपासनापंथ दूर सारून हरिनामजप करणे हाच सर्वांचा उद्धाराचा मार्ग आहे.

हरिनामाच्या उच्चाराने अनंत पातकाच्या राशीसुद्धा एका क्षणात नष्ट होतात. वाळलेले गवत अग्नीच्या संपर्कात येताच जसे अग्नीरूप होते, तसे हरिचे नामस्मरण करणारा हरिरूपच होतो. हरिनामाचा उच्चार हा अपार सामर्थ्यवान असा मंत्र आहे. त्यामुळे पंचमहाभूतांची बाधा आणि भिती नाहिशी होते. ज्ञानराज म्हणतात- माझा हरी इतका सामर्थ्यवान आहे की, प्रत्यक्ष उपनिषदांसही त्याच्या स्वरुपाचा निर्णय करता येत नाही.

**ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ।**
**न करवे अर्थ उपनिषदां।।**
**श्रीहरि परमात्म्यास व ज्ञानराजांना वंदन!**

**- नामदेव सदावर्ते,**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## निष्ठावंत भाव, भक्तांचा स्वधर्म

निष्ठावंत म्हणजे कोण? हा खरंच कठीण प्रश्न आहे. निर्व्याज स्थैर्य म्हणजे निष्ठा. मग हे स्थैर्य कशाच्या संबंधी असावे? माझ्या भाषेत सांगायचे तर निष्ठा म्हणजे आपले जे इष्ट असेल त्याच्याशी घट्ट चिकटून राहणे व इष्टसंबंधी स्वप्नातसुद्धा चुकून कधी संशयाला जागा नसावी. नित्य दृढता, स्थिर, आसक्तपूर्ण, भक्तीने, अनुप्रयोगात राहून कौशल्यपूर्ण व विशिष्ट ज्ञान त्याच्यासंबंधी मिळवित राहणे, म्हणजे निष्ठा होय. जो ही निष्ठा ठेवतो, तो निष्ठावंत होय. माणसांचा माणसावर विश्वास राहिलेला नाही. जोपर्यंत माणूस या वैषयिक संसारात असेल, तोपर्यंत विषय लोभामुळे अविषयाशी प्रामाणिक राहू शकत नाही. माणूस संपून देवत्व प्राप्त करतो, तेव्हाच विषय सुटलेले असतात.

**- बंडोपंत कुलकर्णी**

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म।
निर्धार हे वर्म चुको नये।।
निष्काम निश्चळ अंतरी विश्वास।
पाहू नये वास आणिकांची।।
तुका म्हणे ऐसा कोण ऊपेक्षिला।
नाही ऐकिला पाहिला ऐसा कोणी।।

हा अभंग वाचताना जितका सुलभ वाटतो तितका तो नाही. हा अभंग तुम्हीच तुमचे चारित्र्य तपासा म्हणून सांगणारा आहे. येथे स्वतःच्या स्वतःवर असलेल्या विश्वासाला डिवचण्याचा प्रकार आहे. जर आपण आपल्यावरील आपल्याच विश्वासाच्या खरेपणात उतरण्यात अयशस्वी झालो, तर आपले मनोधैर्य खचू शकते. संतांनी साधकांना गोड बोलून, शालीन भाषेत, खोचक भाषेत, टोमणे मारून वा प्रसंगी शिव्या घालून साधकांना या कल्याणपथावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. हा अभंग शालीन भाषेत साधकांच्या काळजाला इजा करणारा आहे. आपण हा अभंग समजून घेऊ.

निष्ठावंत म्हणजे कोण? हा खरंच कठीण प्रश्न आहे. निर्व्याज स्थैर्य म्हणजे निष्ठा. मग हे स्थैर्य कशाच्या संबंधी असावे? माझ्या भाषेत सांगायचे तर निष्ठा म्हणजे आपले जे इष्ट असेल त्याच्याशी घट्ट चिकटून राहणे व इष्टसंबंधी स्वप्नातसुद्धा चुकून कधी संशयाला जागा नसावी. नित्य दृढता, स्थिर, आसक्तपूर्ण, भक्तीने, अनुप्रयोगात राहून कौशल्यपूर्ण व विशिष्ट ज्ञान त्याच्यासंबंधी मिळवित राहणे, म्हणजे निष्ठा होय. जो ही निष्ठा ठेवतो, तो निष्ठावंत होय.

माणसांचा माणसावर विश्वास राहिलेला नाही. जोपर्यंत माणूस या वैषयिक संसारात असेल, तोपर्यंत विषय लोभामुळे अविषयाशी प्रामाणिक राहू शकत नाही. माणूस संपून देवत्व प्राप्त करतो, तेव्हाच विषय सुटलेले असतात. विषयमुक्त झाल्यावर माणसाला देवत्व प्राप्त होते म्हंटले तर अतिशयोक्ती होणार नाही. भक्त तो, जो त्याच्या इष्टापासून विभक्त नसतो. म्हणजे भक्त हा ईश्वरापासून कधीच विभक्त नसतो.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

म्हणून भक्त हा एकमेव वर्ग आहे, जो या पृथ्वीतलावर निष्ठावंत आहे. या निष्ठेसमोर ईश्वर हतबल होतो. माऊली म्हणते-

**भक्तांकारणे येणें घेतलीसे आळी।**
**दहा गर्भवास सोशी वनमाळी।।**

राहिला प्रश्न इतर लोकांचा. इतर जे लोक स्वतःला निष्ठावंत म्हणवून घेतात वा सांगतात, ते धादांत खोटे बोलतात. त्यांची निष्ठा तकलादू असते. कारण सर्वात कठीण म्हणजे भक्ती आहे. अप्रत्यक्ष ईश्वराशी एकनिष्ठ वा निष्ठावंत राहणे, महाकठीण आहे. तुकाराम महाराज म्हणतात-

**रूप नाहीं रेखा जयासि आकार।**
**आम्हीं तो साकार भक्तिं केला।।**
**यापुढे तुकोबाराय म्हणतात,**
**तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे।**
**येरा गाबाळाचे काय काम।।**

जेव्हा भक्ती ही आपल्या अंतिम स्तरावर असते, तेव्हा भक्त आपोआपच निष्ठावंत होतो. कारण ईश्वराशी निष्ठावंत राहणे, हे भक्ताचे मूलभूत लक्षण व गुण आहे. भक्ताचे भक्तिमार्गातून पतन झाल्यावर तो निष्ठावंत राहत नाही. भक्तिमार्गातून पतन घडू नये म्हणून दृढ निर्धाराने ईश्वर ध्यान, नामस्मरण, चिंतन व सेवेत गर्क राहावे व त्यालाच जीवन समजून नित्यनेम करावे. म्हणून तुकोबाराय म्हणतात-

**निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म।**
**निर्धार हे वर्म चुको नये।।**

या अभंगातील दुसरे चरण हे वर चिंतन केलेल्या चरणाशी संदर्भीत आहे. या चरणात भक्तिचे विस्तारवर्णन आहे. निष्काम या संज्ञेचे अनेक अर्थ आहेत. अनिच्छा, अनासक्ती, कोणत्याही प्रकारच्या फलाची अपेक्षा न करता केलेले कर्म, तटस्थ वा विनाआकांक्षा, साक्षीभावाने केलेले मानसिक कर्म असे अनेक अर्थ आहेत. तथापि, यातील अध्यात्मास अभिप्रेत अर्थ म्हणजे फलाची अपेक्षा न करता तटस्थ साक्षीभावाने केलेले कर्म म्हणजे निष्काम कर्म होय. सांख्य आणि गीता इत्यादींच्या मताने असे कार्य केल्याने मन शुद्ध होते आणि मुक्त होते. निश्चळ म्हणजे अचल, स्थिर व अपरिवर्तनशील.

तुकोबाराय हे भक्तांना आपल्या ध्येयापासून दूर जाऊ नका म्हणून सांगत आहेत. तुम्ही तुमच्या इष्ट ईश्वरावर दृढ विश्वास ठेवा. तो ठेवत असताना आपला भाव निष्काम व निश्चळ पाहिजे. शिवाय तो विश्वासही निष्काम व निश्चळ हवा. त्याच्याशिवाय तुमच्या पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, देहातील पंच महाभूते, मन, बुद्धी, चित्त, अहंकार वगैरे सर्व तत्त्वांत फक्त आणि फक्त इष्ट ईश्वर भरलेला असावा व तोच भरलेला आहे, असा दृढ विश्वास ठेवावा. तेथे वैकल्पिक ईश्वर वा अन्य देवतांना स्थान नसावे. माऊली म्हणते-

**आकरावरी सातवे होते।**
**सातवे कोठे मावळले गे माये।।**
**सहस्राची भरोवरी जाली गे माये।**
**लयलक्षी पाहे तव चोजवेना।।**
**रखुमादेवीवरू दोन्ही घेतली।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**विरूनी टाकली ब्रह्मडोई।।**

ईश्वर जळी, तळी, काष्टी, पाषाणी व सर्व जीवजंतूंत भरून असला, तरी त्याच्या प्राप्तीपर्यंत इष्ट तेवढाच आपल्या देहात वास करावा. कारण अनेकांत मन रमल्यावर मन विचलित होते. संत जनार्दन महाराज म्हणतात-

**काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल।**
**नांदतो केवळ पांडुरंग।।**
**दश इंद्रियांचा एक मेळा केला।**
**ऐसा गोपाळकाला होत असे।।**
**देखिली पंढरी देही जनी वनी।**
**एका जनार्दनी वारी करी।।**

जनार्दन महाराजांनीसुद्धा तेच सांगितले. उदाहरण पाहू. लग्नाचे वय झाल्यावर मुलगा-मुलगी वधु-वर परीक्षेस सामोरे जात असतात तेव्हा पाहिलेली प्रत्येक मुलगी-मुलगा क्षणभर आपली पत्नी-पती आहे, असे वाटते. पण जेव्हा लग्न होते तेव्हा नजरेत कितीही स्त्रिया दिसल्या तरी त्या सर्व स्त्रियांत फक्त एकमेव स्त्री पत्नी म्हणून दिसते, नव्हेतर तीच पत्नी असते. उर्वरित सर्व स्त्रिया वा इतर नाती असतात. म्हणजेच मन विचलित होत नाही. त्याचप्रमाणे मन निष्काम व निश्चळ विश्वासाने निपुण असावे. म्हणून संत सांगतात-

**निष्काम निश्चळ अंतरी विश्वास।**
**पाहू नये वास आणिकांची।।**

शेवटच्या चरणात निष्काम व निश्चळ विश्वास व देह इष्ट ईश्वराने भरलेल्या साधनेची फलश्रुती सांगितली आहे. उपेक्षा म्हणजे औदासिन्य वा दुर्लक्षित. उपेक्षित व्यक्तिच्या विचारांमध्ये तीव्र विसंगती असते आणि त्याला वैचारिक संघर्षाचा सामना करावा लागतो. ना त्याला कुठल्या वस्तूमध्ये रस असतो, ना कुठल्या कामात त्याचा उत्साह असतो. सामान्यतः ज्या गोष्टी भावनांना उत्तेजन देत मानसिक आजाराला बळी पडतात. हे का घडते, तर एकतर आजारामुळे अथवा ईश्वर कृपेच्या अभावामुळे. यात ईश्वराचा सहभाग नसतो. कारण तो ईश्वराकडे भक्त होण्यास गेलेलाच नसतो. तो सकाम गेलेला असतो. तेव्हा भगवंत शांत असतो व त्याला त्याच्या कर्मावर सोडतो, पण जो ईश्वर भक्तीत लीन होतो, त्याचा अव्हेर वा उपेक्षा भगवंत कधीच करीत नसतात. उलट त्याचे कर्म स्वतःकडे घेतात. म्हणून भगवंत उपेक्षित भक्त सापडणे नाही.

अशाच प्रकारे ज्ञानेश्वरीत फलश्रुती सांगताना माऊली म्हणते-

**आपुला ठाय न सांडिता। आलिंगिजे चंद्रु प्रकटता।**
**अनुरागु भोगितां। कुमुदिनी जाणे।।**
**आकर्षोनि चित्त चैतन्य। भरोनी ठेले लोचन।**
**ध्यानी विसर्जिले मन। बोली अरूपाचे रूप दावीन।**
**अतिंद्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवी।।**
**जे मन बुद्धी इही। घर केले माझ्या ठायी।**
**तरी सांगें मग काई। मी तूं ऐसे उरे।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

नामदेव महाराज म्हणतात-

**नामा पाहे देही तंव उभा चहूं बाही। दिशाद्रुमित दाही हरि दिसे।।**

बहिणाबाई म्हणते-

**देहाचा पालट विठोबाचे भेटी। जळ लवणां गांठी पडोन ठेंली।।**
**धन्य मायबाप नामदेव माझा। तेणें पंढरिराया दाखविले।।**
**रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पायीं। चित्त ठायीचे ठायी मावळले।।**

ज्याने इष्ट ईश्वरावर निष्काम व निश्चळ विश्वास ठेवला, त्याला तो प्राप्त झाला. ईश्वराची उपेक्षा केली व त्यास इष्ट प्राप्त झाला, असे एकही उदाहरण शोधूनही सापडणार नाही. संत रामदास स्वामी म्हणतात-

**अनंताचा अंत पहावया गेलों। तेणें विसरलों आपणासी।**
**आपणा आपण पाहतां दिसेना। रूप गवसेना दोहींकडें।।**
**दोहींकडें देव आपणची आहे। संग हा न साहे। माझा मज माझा मज।।**
**भार जाहला बहुत। देखतां अनंत कळों आला।।**
**कळों आला भार पाहिला विचार। पुढें सारासार विचारणा ।।**
**विचारणा जाली रामीरामदासीं। सर्वही संगासी मुक्त केलें ।।**
**मुक्त केले मोक्षा मुक्तिची उपेक्षा। तुटली अपेक्षा कोणी एक।।**

सर्व संतांचा अनुभव सारखाच आहे. मग ज्याने ईश्वराची उपेक्षा केली, त्याने काहीच मिळविले नाही. उलट स्वतःच उपेक्षित राहिला. म्हणून संत म्हणतात-

**तुका म्हणे ऐसा कोण ऊपेक्षिला।**
**नाही ऐकिला पाहिला ऐसा कोणी।।**
**कृष्णार्पणमस्तू। आत्मा मालिक।**

**- बंडोपंत कुलकर्णी, सोलापूर**
(धर्मादाय सहआयुक्त, लातूर)

***



## मुक्ताईच्या आसवांना सोहंभावी शीतलता

अहंता मनाला शिवू न देणारी ही चिमुकली 'अहं तेचि दुःख।' असा निर्वाळा देऊन टाकते! मोहममता तर विष आहे, असे सांगून त्यागण्याचा सल्ला विश्वाला देते! साधकबाधक विवेकाला महत्त्व देते. मतीमार्ग तर्कशुद्धता शोधल्याचे कबूल करते, सत्व आकळते, सूक्ष्म मार्ग सांगते, सोहंभाव समजावते. मूर्तामूर्त भाव नजरेस आणते.

मोहमाया, अहंता यापलीकडे जाणाऱ्या अपार विवेकशील अशा संत मुक्ताईला आयुष्यात कधीही आसवं स्पर्शू शकले नसतील काय? भावनांचा भर पापण्या ओल्या करू शकल्या नसतील काय? अजानवृक्षाच्या पाराशी हमसून हमसून काळीज हलकं हलकं करावसं वाटलं नसेल काय?

-डॉ. सुनील शिंदे

वैयक्तिक पारिवारिक दुःखांची, संकटांची किनार गडद असते, ठसठसती असते, हळवी असते. सातत्याने अस्वस्थ भावनेची सल ओली ठेवणारी असते. ज्याची असते त्यालाच ती भरीव शिकवण देणारी असते. अनेकांना मुळातून सावरून उभारी देणारी असू शकते. आत्मिक, आध्यात्मिक बळ असणारा तरतो, सावरतो त्यातून. ज्ञानदेवादि भावंडांचे आईवडील विठ्ठलपंत-रुक्मिणी त्यांच्या अन् मुलाबाळांच्याही दृष्टीने अकाली गेले.

आघात मोठा होता. कोलमडून टाकणारा होता. भावनांची संमिश्र घुसळण करणारा होता. कितपत अन् कसे सोसावे हे कळण्याचे वय नव्हते. कोवळ्या वयाची ही लेकरं तरीही अतर्क्य, असाधारण, अफाट मनोसामर्थ्याची-मनोबलाची तावूनसुलाखून निघाली, समंजस झाली, सोशीक घडली. काळाच्या कराल संकटावर प्रचंड मन:सामर्थ्याने पाय घट्ट रोवून उभी राहिली, सावरली. अवघ्या जगाला (आपल्यावरील संकटातूनही) शहाणपण शिकवून गेली.

**'मन मारुनि उन्मन करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।'**

अशी आर्त हाक आपल्या लाडक्या ज्ञानादादाला-विश्वगुरुदेवाला देणारी चिमुकली चित्कळा मुक्ताई एवढी समंजस तर मग तिची तिन्ही वडीलधारी मोठी भावंडं केवढी कमालीची समंजस असतील, याची कल्पनाच केलेली बरी!

मुक्ताईला काय मनाच्या मर्यादा नव्हत्या? हसण्या खेळण्याचे-बागडण्याचे वय नव्हते? अवतीभवती समजून घेणारे समवयस्क सवंगडी नव्हते? समजून घेण्यासाठी समाजमन नव्हते, हट्टीपणा नव्हता? काय नव्हते अन् काय होते, यापेक्षा खरेतर आलेल्या-असलेल्या परिस्थितीत काळाचे भान-शहाणपण-अनुभवाची धगधगती शिदोरी तिला घडवून गेली.

**सर्वी सर्व सुख अहं तेचि दुःख। मोहममता विष त्यजीयेलें।।१।।**
**साधक बाधक करूनि विवेक। मति मार्ग तर्क शोधियेला।।२।।**
**सर्वतीर्थ हरि दुभाळु धनुवो। वोळला कणवा चातकाचा।।३।।**
**सूक्ष्ममार्ग त्याचा भक्त देहीं मायेचा। आकळावयाचा सत्व धरीं।।४।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**वेद जंव वाणी श्रुति तुपें काहाणी। ऐको जाय कर्णीं तंव परता जाय।।५।।**

**मुक्ताई सोहंभावें भरले दिसे देवें। मूर्तामूर्त सोहंभावे हरि घोटी।।६।।**

अहंता मनाला शिवू न देणारी ही चिमुकली 'अहं तेचि दुःख।' असा निर्वाळा देऊन टाकते! मोहममता तर विष आहे, असे सांगून त्यागण्याचा सल्ला विश्वाला देते! साधकबाधक विवेकाला महत्त्व देते. मतीमार्ग तर्कशुद्धता शोधल्याचे कबूल करते, सत्व आकळते, सूक्ष्म मार्ग सांगते, सोहंभाव समजावते. मूर्तामूर्त भाव नजरेस आणते.

मोहमाया, अहंता यापलीकडे जाणाऱ्या अपार विवेकशील अशा संत मुक्ताईला आयुष्यात कधीही आसवं स्पर्शू शकले नसतील काय? भावनांचा भर पापण्या ओल्या करू शकल्या नसतील काय? अजानवृक्षाच्या पाराशी हमसून हमसून काळीज हलकं हलकं करावसं वाटलं नसेल काय? आईबाबांनी ज्या सिद्धेशाला मनोभावे प्रणाम केला,फेऱ्या घेतल्या त्या पायरीशी डोकं टेकून आसवांना वाट करून द्यावीशी वाटली नसेल काय? इंद्रायणी घाटाशी शीळेशी संवाद साधत पापण्यांना पूर आला नसेल काय? नक्कीच नक्कीच त्या काळजालाही ओलावलेला मूक संवाद आसवांना वाट करून देत साधावा वाटला असेलच असेल, शंकाच नको.

ती योगिनी होती, मुक्ता होती, समंजस होती, सालस होती. कमालीची सोज्वळ होती, शीतल होती आणि तरीही कडाडती चित्कळाही होती. अपार क्षमाशील होती. मायेनं ओथंबलेली होती, विनयशील  होती, सडेतोडही होती! अखंड तेवणारी निरांजनी ज्योती होती. स्निग्ध परमपावन गंधभरली मोगऱ्याची ओंजळही होती अन् नाजुकली पारिजातकाचा दरवळणारा सडादेखील होती. साऱ्या साऱ्या परस्पर विरोधी भावभावनांचा कल्लोळ होती अन् कमालीची शांत प्रशांत तत्वविमर्शक साधिकाही होतीच होती! मनाची धूप दीपकता उलगडून सांगताना, चंपक गंधित सत्य उलगडताना अन् मनीचा सामावलेला भगवंत नारायण समजून सांगताना काय म्हणते पाहा-

**पूजा पूज्य वित्तें पूजक पै चित्ते। घाली दंडवतें भाव शीळ।।१।।**

**चंपक सुमनें पूजी कातळीने। धूपदीप मनें मानसिक।।२।।**

**भावतीत भावो वोगरी अरावो। पाहुणा पंढरीरावो हरि माझा।।३।।**

**मुक्ताई संपन्न विस्तारूनि अन्न। सेवी नारायण हरि माझा।।४।।**

'पाहुणा पंढरीरावो तो हरि माझा' हा उत्कट भाव मुक्ताई नजरेस आणते. सोहंभावी आत्मदेव, आत्मभाव संपन्न कसा आहे, याची तेवढीच स्वानुभवी जाण असणारी मुक्ताई आसवांची शीतलता जपणारी आहे अन् सोहंभावी शीतलता समजणारी देखील आहे.

**- डॉ. सुनील शिंदे**

'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
ए-१, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

***



## सृष्टी विज्ञान आणि आध्यात्मिक दृष्टिकोन

दत्तात्रेयांनी ज्ञानप्राप्तीसाठी स्वतः २४ गुरू केले होते. त्यामध्ये पंचमहाभूते ही पूजनीय मानली आहेत. आपल्याकडे वृक्ष, नद्या (जल), पर्वत, अग्नी, सूर्य, पृथ्वी (जमीन) या सर्वांकडून जगतास होणाऱ्या जीवन उपकारास्तव त्यांचे वंदन-पूजन करण्यात येते. आपल्या जीवनावश्यक गरजा हवा, पाणी, अन्न, निवारा हे आपणास पंचमहाभूताकरवी मिळतात. जंगले ही पृथ्वीतलावरील सर्व प्राणीमात्रांस पोषण देणारी व्यवस्था आहे. वृक्ष हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड शोषून जीवास जगण्यासाठी आवश्यक प्राणवायू देतात. जमिनीतील मातीची धूप रोखणे, भूगर्भात जलपातळी टिकविणे ही मोठी नैसर्गिक कामे जंगलाकडून होतात. देवांनाही वृक्ष प्रिय आहेत.

**- बी. के. गायकवाड**

परमात्म्याने अनंत ब्रह्मांडांची निर्मिती करून आपल्या दिव्य प्रकृती मायेतून सृष्टीची निर्मिती केली. निर्गुण निराकार ब्रह्म, त्रिगुणात्मक प्रकृती माया आणि असंख्य जीवांची निर्मिती झाली.

सृष्टी रचियेता ब्रह्मा, सृष्टीचे पालनपोषण, रक्षण करणारे विष्णू आणि संहार करून पुनर्निर्मितीचे कार्य महेश अर्थात शिवशंकर सांभाळतात. आप, तेज, वायू, आकाश, पृथ्वी या पंचमहाभूतात्मक सृष्टीत परमात्म्याचे आत्मतत्व सर्वत्र व्यापून उरलेले आहे.

निसर्गात विविधता आहे. प्राणी जगत व वनस्पती सजीव चेतनायुक्त, पदार्थांचे जडत्व आणि गुणधर्मयुक्त त्रिगुणात्मक प्रकृती मायेच्या आणि काळाच्या बंधनात बद्ध आहे. मनुष्यप्राणी हा पंचमहाभूतात्मक देह, मन, बुद्धी आणि अहंकार या अष्टदा प्रकृतीचा असून इतर सर्व प्राणीमात्रांत अधिक बुद्धिवंत आहे.

संत जगद्गुरू तुकाराम महाराज सांगतात, सत्व, रज, तम या गुणांच्या प्रभावाखाली मानव आपल्या कर्माचरणानुसार पुन:पुन्हा जन्म घेतो. त्यामध्ये सत्वगुणांच्या सात्विकतेने मानवाकडून सत्कर्माचे आचरण होते व हातून परमार्थ घडतो.

अनेक जन्माच्या शरीर-धारणेने मनुष्याची देहबुद्धी घट्ट झालेली असते व देह म्हणजे 'मी' या धारणेतून मनुष्य वर्तन करतो. देहाच्या सुखासाठी आयुष्यभर स्वत:ला कष्टवतो. वस्तूच्या प्राप्तीसाठी माया-प्रपंचात गुंततो. जीवाला आनंद प्राप्त होईल या आशेत, कर्माच्या बंधनात सुख-दु:ख अनुभवतो.

संत सांगतात, अनेक जन्मांनंतर प्राप्त झालेला हा मानवदेह दुर्लभ आहे. या जन्मात मानवाने आपले आत्मकल्याण करून घ्यावे. मी म्हणजे शरीर नसून एक 'आत्मा' आहे व आत्मा हेच माझे सत्य, निजस्वरूप आहे, हे जाणून घेणे हेच या जन्माचे ध्येय आहे.

परमात्म्याने या सृष्टीचे पालन, पोषण, रक्षण करता सृजनाचे रक्षण आणि दुर्जनांचा नि:पात करण्यासाठी वेळोवेळी ईश्वरी अवतार धारण केले. त्यात श्रीविष्णूचा अवतार श्रीराम, श्रीकृष्ण, वामन, श्री दत्तात्रयांचे अवतार, नवनाथ अवतार तसेच देवी-देवतांचे अनेक ईश्वरी अवतार. या सर्व अवतारकार्यात

देवांनी सर्वांसाठी ईश्वरभक्ती प्रेमाचा प्रसार केला आहे. सर्वांच्या हृदयमंदिरी असलेला आत्मा एकाच परमात्म्याचा अंश आहे व तो सर्वांठायी आत्मरूपाने विलसत आहे. संत सांगतात, 'आपण सर्व एकाच भगवंताची लेकरे आहोत. सर्वांवर प्रेम करा.'

**जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत।** अशी आपली वृत्ती ठेवा.

परमात्मा श्रीकृष्णाने परमभक्त अर्जुनास गीता निवेदली. सर्व वेदांचे व श्रुतीचे सार असलेली श्रीमद्भगवत गीता ज्ञानेश्वर माऊलींनी मराठी प्राकृत भाषेतून ज्ञानेश्वरीच्या रुपाने लिहिली. गीता ही सर्वांसाठी जीवनदायीनी आहे. त्यात भगवंतांनी मनुष्यास ज्ञान, कर्म आणि भक्ती याद्वारे आचरणाने मुमुक्षू जीवाच्या आत्मउद्धारास्तव मार्ग दाखविला आहे. अहंकारमुक्त राहून निष्काम कर्माचरण आणि ईश्वराप्रति शुद्ध भक्तिभाव, श्रीगुरूंना अनन्य भक्तिभावाने शरण जाऊन श्रीगुरुकृपेने भक्ताचा आत्मोद्धार होऊन त्याला जीवनात शाश्वत सुख, समाधान व शांती प्राप्त होते व जीवनमुक्त अवस्था प्राप्त होते. श्रीगुरु हे साक्षात परब्रह्माचे अवतार आहेत.

दत्तात्रेयांनी ज्ञानप्राप्तीसाठी स्वतः २४ गुरू केले होते. त्यामध्ये पंचमहाभूते ही पूजनीय मानली आहेत. आपल्याकडे वृक्ष, नद्या (जल), पर्वत, अग्नी, सूर्य, पृथ्वी (जमीन) या सर्वांकडून जगतास होणाऱ्या जीवन उपकारास्तव त्यांचे वंदन-पूजन करण्यात येते. आपल्या जीवनावश्यक गरजा हवा, पाणी, अन्न, निवारा हे आपणास पंचमहाभूताकरवी मिळतात.

जंगले ही पृथ्वीतलावरील सर्व प्राणीमात्रांस पोषण देणारी व्यवस्था आहे. वृक्ष हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड शोषून जीवास जगण्यासाठी आवश्यक प्राणवायू देतात. जमिनीतील मातीची धूप रोखणे, भूगर्भात जलपातळी टिकविणे ही मोठी नैसर्गिक कामे जंगलाकडून होतात. देवांनाही वृक्ष प्रिय आहेत. बेल, औदुंबर, वड, पिंपळ, आवळा, नारळ, आंबा, कडुलिंब, शमी, पारिजातक अगदी गवतातील हरळी (दूर्वा) श्री गणेशास प्रिय आणि कमळपुष्पही देवप्रिय आहेत. म्हणूनच आपले पूर्वज अशा वृक्षांच्या देवराईची जंगले राखीव ठेवीत. आयुर्वेदानुसार विविध आजार बरे करण्यासाठी अनेक औषधी वनस्पतींचा उपयोग होतो. हे सर्व वृक्ष कल्पवृक्षाची रूपे आहेत. त्यांचे जतन संवर्धन करण्यात मानव हित आहे. श्रीसंत जगद्गुरु तुकाराम महाराज आपल्या एका अभंगातून सांगतात-

**वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें।**
**पक्षी ही सुस्वरें आळविती।।**

भारतभूमीतून वाहणाऱ्या गंगा, यमुना, गोदावरी, नर्मदा, कावेरी यांसारख्या अनेक मोठ्या नद्या आजवरच्या मानवी व सर्व प्राणिमात्रांसाठी जीवनदायीनी आहेत. नद्यांकाठी आपली हजारो वर्षांची संस्कृती, नगरे, वसाहत जपली गेली. आजही आपण नद्यांची गंगा आरती, नर्मदा परिक्रमा करून त्याप्रति आपली श्रद्धा व भक्तिभाव समर्पित करीत आहोत. या पवित्र नद्या जलाने भरपूर भरून राहोत व शुद्ध राहोत. त्यांचे पाणी जीवन रक्षण करोत, अशी प्रार्थना आपण करतो. जल हे विष्णूस्वरूप आहे.

आपल्याकडे यज्ञात अग्नी नारायणाचे विधिवत पूजन करून मंत्रघोषात आहुती समर्पित करण्यात येते. हे करीत असताना इदं न मम म्हटले जाते. यात देवा माझे काहीही नाही. सर्व कर्ता-दाता तूच आहेस म्हणून भगवंतास शरण जावे.

या संपूर्ण सृष्टीतील निसर्गचक्र ईश्वरी सत्तेने निरंतर चालू राहते. जीवमात्रांस अनुकूल असलेल्या सर्व बाबी निसर्गाकडून प्राप्त होत असतात.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

रामायणांत एका प्रसंगी महर्षी विश्वामित्र अयोध्येचा राजा दशरथाकडे येतात. प्रथमदर्शी ऋषी विश्वामित्र राजाला विचारतात, राजा तुझ्या राज्यातील प्रजा सुखी-आनंदात आहे ना? राज्यात धान्य भरपूर पिकते ना? राज्यातील जलाशये पाण्याने तुडुंब भरलेली आहेत ना? या प्रश्नांचा रोख निसर्गाच्या अनुकूलतेच्या अनुषंगाने होता. हजारो वर्षे लोटली तरी हे प्रश्न आजच्या काळातही तेवढेच महत्त्वाचे आहेत.

त्यासाठी मानवाने संतसंगतीत आपल्या सात्विक कर्माचरणाचे दायित्व जतन करणे आवश्यक आहे. गौतम बुद्ध यांची अहिंसा, सहिष्णुता, परोपकार, संयम, शांत वृत्तीची शिकवण अनुसरणीय आहे. सृष्टीतील पंचमहाभूतात्मक पृथ्वीतत्व, जलतत्व, अग्नीतत्व, वायूतत्व व आकाशतत्व ही सर्व ईश्वरतत्वास अनुसरून आहेत आणि श्रीगुरुतत्व हेच ईश्वरतत्व असल्याने गुरुचरणी अनन्यभावे शरण जावे.

श्रीगुरु षोडश कलांनी परिपूर्ण परब्रह्मावतार आहेत. वरील सर्व तत्वे त्यांच्यात सामावलेली आहेत. आपले शरीर हे देवतामय आहे. षड्चक्रांकित देहात आत्म्याचा निवास असतो. पिंडी ते ब्रह्मांडी आहे. आपले शरीर हे पंच ज्ञानेंद्रिय व पंचकर्मेंद्रिये अशा दहा इंद्रियांचे आहे. त्यावर मनाचा ताबा असतो व मन हे आहारापासून बनते. म्हणून आपल्या आहारासंदर्भात सावध असावे लागते. जसे आहाराचे गुण, त्यानुसार आपले विचार होतात. सर्व संतांनी मानव कल्याणासाठी अखंड विश्वात्मक कार्य केले आहे. संत ज्ञानेश्वर माऊली यांनी, हे विश्वचि माझे घर या संकल्पनेस अनुसरून लोककल्याणासाठी परमात्म्याकडे पसायदान मागितले आहे. त्यातून ते म्हणतात :

**जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मीं रती वाढो।**
**भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचें।।२।।**
**दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्यें पाहो।**
**जो जें वांच्छील तो तें लाहो। प्राणिजात।।३।।**
**वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।**
**अनवरत भूमंडळीं। भेटतु या भूतां।।४।।**

निसर्गचक्रातील, पंचमहाभूतांतील घटक, त्यांच्यातील संतुलित पर्यावरण हे सृष्टीविज्ञान, तर मानवासह सर्व प्राणिमात्र जीव-जंतू यांच्यातील जीवात्मा यांचे आध्यात्मिक ज्ञान, आत्मज्ञान या दोहोंचे अस्तित्व निसर्गकालचक्रात दृढ आहे. यातील सृष्टी व विज्ञान परिवर्तनशील कालाधिन आहेत, तर आत्मा व आत्मतत्त्व चिरंतन, नित्य अविनाशी, अमर आहे.

जीवनात शाश्वत सुख शांती व समाधान यासाठी सत्संगतीतून आपले मन, चित्त स्थिर व शुद्ध करून परब्रह्म स्वरूप श्रीगुरूंना अनन्यभावे शरण जावे. आपले निजस्वरूप जो की आत्मा, त्याला जाणून घेण्यासाठी ध्यान करावे. श्रीगुरूकृपेने आत्मज्ञानाची प्राप्ती होईल. आत्मा मालिक.

(संदर्भ : १. श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रग्रंथ २. सार्थ श्री ज्ञानेश्वरी)

**- बी. के. गायकवाड**
प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी,
सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे : ४११००९
मो. नं. ९४०३०२६१६४

***



## सौभाग्य

एक बार आत्मा से प्यार हो गया, तो सबकुछ बदल जाएगा, हर रास्ता खुल जाएगा और सभी आठ सिद्धियाँ और नौनिधियाँ आपके रास्ते पर ही अपना ऑफिस खोल लेगीं। जितना भी आत्मा का ध्यानकर उससे प्रेम कर उसकी आवाज़ के साथ सुर मिलाओगे, उतना ज़्यादा हमारा ऍक्सेसऑटोमॅटिक रूप से सिद्धियों और निधियों के साथ हो जाएगा, पर यह बातइतनी ज़्यादा आत्मिक है कि सच्चाई केवल स्वयं के अंदर से ही पता चल सकती है।

**-नीता यादव**

**हँस के समय को प्यार कर, कर आत्मा का ध्यान।**
**गुरु वर का युग साथ है, छोड़ सही समय अज्ञान।।**

पिछले दिनों हम सपरिवार यूरोप यात्रा परथे, घूमने में काफ़ी एरिया कवर किया, सब तरह का कल्चर देखा, विरासतें देखीं,पुरातन से लेकर वर्तमान तक का ऐश्वर्य देखा, कई तरह के लोगों लोगों को देखाऔर मिले। एकाद सज्जन ऐसे भी मिले जो वास्तव में तो हमउम्र थे, पर उनकीबातों से लगा उनकी उम्र शताब्दियों में है, क्योंकि वह उस अवस्था में थे। जबकोई पैसे और उससे जुड़े समस्त भौतिकवाद के चार्म्स के बाद की सीमाओंसे पार होकर उससे परे खड़ा होकर ख़ालीपन देखता है; और सोचता है! शादियोंके अनुभवों में दुनिया के समस्त वैभवों को लड़ मर के इकट्ठा किया,वैभवशाली साम्राज्य बनाया और खूब फैलाया, पर; सब कुछ के बाद भी राह ना मिली,तब हमारी संस्कृति की तरफ़ उसकी नजरें एक प्यास का आभास करातीं है। औरजब गुरुदेव की बात होती है, तो बड़े उत्साह से बोलते हैं, आप बड़ेभाग्यशाली हैं, जीवन तो आपका ही है क्योंकि आपके साथ आपके जीवन में आपकेसद्गुरू-गुरुवर साक्षात् और जीवंत है। यह हज़ारों सालों में अरबों लोगों में कुछही लोगों के साथ होता है। आपकी सांस्कृतिक सनातन संस्कृति में शताब्दियोंमें सब तरह की परेशानियों से गुजरने के बाद भी यह सौभाग्य कुछ ज़्यादा है,जहाँ ठहराव की गुंजाइश है, यह सुन तुरंत ही कविता फुट पड़ी :

**जीवन तूँ बड़ भाग है, सद्गुरू जीवनपाये।**
**ना जाने कितने गये, इस कालन मेंआये।।**

अतः हम इस महिमा को समझे और अपनेआत्मिक विकास का सद्गुरू के साथ जो सौभाग्य प्राप्त हुआ है, उसका बेहतरीन सेबेहतरीन उपयोग करें। अतः आगे गुरु कृपा में कविता की कुछ औरपंक्तियाँ कहती हूँ -

**मौका है आत्म चिंतन का,**
**स्वयं के कर्मों से मिलन का,**
**सोचें! जतन से,**
**अब तक क्या किया?**
**समय को बरबाद किया,**
**यदि ख़ुद से न कभी प्यार किया।**
**यह स्वर्ण समय है, पुनर्व्यवस्था का,**
**परिवर्तन करना है, अपनी मन:अवस्था का।**
**ये समय मिला है,**
**स्वयं से मिलन का,**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

दुर्विचार का त्याग कर,
सुविचार में विलीन होने का।
तो व्यर्थ न गवाये इसे निरर्थक कर्मों में,
फल और सार है ; केवल और केवल सत्कर्मोंमें।
पकड़ ले ध्यान और सत्कर्म की उंगलियां,
गुरुवर का साथ मिला है, तो मिला ले कदम ताल,
और बढ़चल स्वयं के भीतर,
क्योंकि स्वयं से पहचान ही ; जीवन का अंतिम लक्ष्य है।
तो समय है, अंतिम लक्ष्य तक पहुंचने का,
सुन ले अंतरात्मा हमसे ; कुछ कहनाचाहती है,
दुष्कर्मों और मन मस्तिष्क के जाल से,
आजाद होकर रहना चाहती है।
एक बार इसकी सुन ले, ये ही हमे जिताएगी,
डूबती नईया को, इसकी आवाज़ ही पार लगाएगी।
गर अब ना सुनी इसकी, तो भविष्य हमें रुलाएगा,
नष्ट कर हमारी शक्ति,
पश्चाताप की अग्नि में ख़ुद को ही जलाएगा।
पर तब तक हम, सब खो चुके होंगे,
आवाज़ सुनने वाला भी सो चुका होगा।
तब रहम की उम्मीद न रखना,
बस खामोशी से अपने कर्मों का फल चखना।
यही प्रकृति की रीत है,
फिर सच के सिवा कुछ नहीं होगा,
यही बुराई की हार, अच्छाई की जीत है।
आत्मा को तो केवल, परमात्मा से मिलने मेंप्रीति है,
आत्मा को तो केवल, परमात्मा से मिलने मेंप्रीति है।।

इसलिए सच्ची प्रीति पर काम करने के लिए अपनीआत्मा से प्रेम करना बहुत ही आवश्यक है। एक बार आत्मा से प्यार हो गया, तोसब कुछ बदल जाएगा, हर रास्ता खुल जाएगा और सभी आठ सिद्धियाँ और नौनिधियाँ आपके रास्ते पर ही अपना ऑफिस खोल लेगीं। जितना भी आत्मा का ध्यानकर उससे प्रेम कर उसकी आवाज़ के साथ सुर मिलाओगे, उतना ज़्यादा हमारा ॲक्सेसऑटोमॅटिक रूप से सिद्धियों और निधियों के साथ हो जाएगा, पर यह बातइतनी ज़्यादा आत्मिक है कि सच्चाई केवल स्वयं के अंदर से ही पता चल सकती है।बाह्य रूप से ना तो स्वयं और ना ही कोई और इसे ॲक्सेस कर सकता है, अत :सच्चे प्रेमी बनकर अपनी आत्मा से प्रेम करें और जीवंत सद्गुरू से सानिध्य का सौभाग्यपाया है तो इससे बड़ा जीवन के साथ कुछ और हो ही नहीं सकता, इसकाभरपूर सदुपयोग करें, यही हमारे जन्म के उद्देश्य व लक्ष्य को सफल बनाएगी।

|| आत्मा मालिक ||

**- नीता नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

# आत्मा मालिक चैत्र महोत्सव २०२४

आत्मा मालिक ध्यान योग मिशन, आत्मा मालिक ध्यानपीठ कोकमठाण येथे प. पू. आत्मा मालिक माऊली व सर्व संत-महंतांच्या उपस्थितीत दि. २० ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान आत्मा मालिक चैत्र महोत्सव चैतन्यमय वातावरणात साजरा झाला.

दि. २० आणि २१ रोजी रोजच्या कार्यक्रमांतर्गत पहाटे पादुका पूजन, काकड आरती, सकाळी मौन ध्यान, सकाळी ११ ते १२ दरम्यान प. पू. सद्‌गुरु माऊलींच्या सानिध्यात मौन ध्यान, आरती घेण्यात आली. भाविकांनी प. पू. सद्‌गुरू माऊलींचे दर्शन घेतले. तद्‌नंतर दुपारी प्रसाद भोजन व पुनश्च सायंकाळी प. पू. सद्‌गुरू माऊली व संत मांदियाळीच्या सानिध्यात मौन ध्यान, सद्‌गुरू दर्शन आणि सायंकाळी हरिपाठ, भजन सेवा व आरती झाली.

जे भाविक या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नव्हते त्या सर्वांसाठी सकाळ, संध्याकाळ सद्‌गुरूंच्या दर्शनाची सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

आत्मा मालिक चैत्र पौर्णिमा महोत्सवात भाविकांना उन्हापासून त्रास होऊ नये म्हणून आश्रमात ध्यान योग मिशन विद्या संस्थान नजीक सत्संग हॉलबाहेरील परिसरात भव्य मंडप उभारण्यात आला होता. मंदिर परिसर व इतरत्र आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती. आलेल्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्वत्र चांगली व्यवस्था ठेवण्यांत आलेली होती. त्यासाठी आश्रमातील सेवकांसह सर्व सेवाधारी परिपूर्ण सेवा सुविधा उपलब्ध करून देत होते.

दि. २२, सोमवारी आत्मा मालिक चौदस चैत्र महोत्सवाचा महत्त्वाचा दिवस. ब्रह्ममुहूर्तावर पहाटे ५.00 वाजता पादुका पूजन झाले. ह. भ. प. पठारे महाराज व सूर्यवंशी महाराज यांचे भजन आणि त्यानंतर काकडआरती झाली. प्रथम सत्रातील सकाळी ७ ते ८ दरम्यान वैदिक मंत्रोच्चारात पादुका पूजन, अभिषेक झाला.

आश्रमातील गायक श्यामसुंदर सुतार, कबीरानंद महाराज यांनी सुरेल भजने म्हटली. 'जय आत्मदेव, जय आत्मदेव' हे भजन गीत गायले. नंतर महाआरतीने सकाळचे सत्र संपन्न झाले.

आलेल्या सर्व भाविक-भक्तांनी दुपारी महाप्रसाद घेतला. सायंकाळी ठीक ४ वाजता संध्या सत्रात भजन गीते म्हटली व ५ ते ६ दरम्यान प. पू. सद्‌गुरू माऊली, सर्व आश्रमवासी संतांच्या पावन सानिध्यात ध्यान झाले. आलेल्या सर्व भाविकांनी रांगेतून प. पू. सद्‌गुरु माऊलींचे दर्शन घेतले. चैत्र महोत्सवापूर्वी सद्‌गुरु परदेश दौऱ्यावर गेले होते. सद्‌गुरु आपला परदेश दौरा लवकर उरकून या चैत्रोत्सवात आश्रमी आल्याने भाविकांच्या चेहऱ्यावर आनंद होता.

चौदसच्या सायंकाळी ६ ते ७ दरम्यान वाजत-गाजत नगर प्रदक्षिणा दिंडी सोहळा निघाला. फुलांनी सजविलेल्या पालखीमध्ये सद्‌गुरू जंगली महाराजांच्या पादुका ठेवून, नामघोषात हा दिंडी सोहळा आत्मा मालिक सुवर्ण मंदिरात आला. पुष्पवृष्टी केली. संदल पूजा झाली.

सायंकाळी ७ वाजता सुवर्ण मंदिरात आत्मदेवाची पादुका पूजा, ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात षोड्शोपचार पूजा झाली. संत निजानंद महाराज, संत विवेकानंद महाराज यांच्या उपस्थितीत संत

परमानंद महाराज यांनी ही पूजा केली. श्री गुरूंची अवतारलीला चरित्र ग्रंथ अध्यायांचे वाचन करण्यात आले व श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान म्हटले. यावेळी संत परमानंद महाराज म्हणाले, आजचा चैत्र चौदस महोत्सव गुरुपौर्णिमा दिनाइतकाच महत्त्वाचा आहे. त्याचे कारण दि. ४ एप्रिल १८९० मध्ये या चैत्र चौदस दिनी महान संत सद्‌गुरु जंगली महाराज यांनी पुण्यातील भांबुर्डे येथे समाधी घेतली. त्यास १३४ वर्षांचा कालावधी लोटला. प. पू. सद्‌गुरू जंगली महाराज हे अष्टांगयोगी महान संत होते. त्यांनी निर्वाणसमयी भक्तांच्या विनंतीवरून आत्मस्वरूप सगुण रुपाची षडचक्रांकित प्रतिमा प्रगट करण्यास दिली. चैत्र चौदस हा परिवर्तन दिनाचा सोहळा आहे. श्रीगुरूंना अनन्य भावाने शरण जाऊन श्रद्धा-भक्तिपूर्वक अंतःकरणात श्रीगुरूंच्या चरणांचे स्मरण करून आत्मचिंतन करावे. सद्‌गुरूंचरणी १०१ महाभोग अर्पण करण्यात आले होते. आत्मदेवाच्या महाआरतीने या दिंडी सोहळ्याची सांगता झाली.

तद्‌नंतर ज्या भाविकांना नाम घ्यायचे होते, त्यांनी ध्यानपीठाच्या विद्यासंस्थान सत्संग हॉलमध्ये सद्‌गुरु माऊलींकडून नाम घेतले. शेजारती होऊन चौदस कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वांनी प. पू. माऊलींचे दर्शन घेतले व महाप्रसाद घेतला. बाळासाहेब गोर्डे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी महाप्रसादाची चोख व्यवस्था ठेवली होती. कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व भाविकांची निवास व्यवस्था निःशुल्क करण्यात आली होती.

दि. २३ रोजी आत्मा मालिक सुवर्ण मंदिरात प्रातःकाळी काकड आरती होऊन भजने, आत्मदेवाची आरती झाली. ११.०० वाजता सत्संग हॉलमध्ये प. पू. सद्‌गुरू माऊलींच्या सानिध्यात, संत तसेच विश्वस्तांच्या उपस्थितीत मौन ध्यान झाले. गुरुदेवांची अमृतवाणी ध्वनिफितीद्वारे भक्तांसाठी ऐकविण्यात आली. भजन गीतानंतर आत्मदेवाची आरती झाली. सर्व आत्मप्रेमी भक्तांनी रांगेतून सद्‌गुरु माऊलींचे दर्शन घेतले.

साधारणतः बहुतेक आत्मप्रेमी भाविक आपले प्रपंचात नित्य विहित कर्मांत आपला वर्तमानकाळ व्यतीत करीत असतात. सुख-समाधानासाठी कष्टत असतात. यातून परमार्थाकडे मनी ओढ ठेवून ईश्वर भक्तीत मन लागावे, श्री सद्‌गुरू चरणांचे दर्शन होऊन श्रीगुरूंची जीवाला भेट व्हावी, या तळमळीने असंख्य भाविक कोकमठाणला येतात. सद्‌गुरु चरण दर्शनाने आत्मसुखाचा, आत्मनंदाचा अनुभव घेऊन तृप्त होतात व गुरुभेटीसाठी पुन्हा लवकरच आश्रमात येणे व्हावे म्हणून प्रार्थतात.

चार दिवस चाललेल्या या चैत्र महोत्सव कार्यक्रमासाठी तन-मन-धन अर्पून सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानून धन्यवाद दिले.

||आत्मा मालिक||

**संकलन : बी. के. गायकवाड, पुणे**

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

।। आत्मा मालिक ।।





आत्मा मालिक ध्यानपीठाचे कार्याध्यक्ष

**प.पू.संत परमानंद महाराज** यांच्या मातोश्री

# हृदयनिवासी पुष्पा उत्तम ओवले

# भावपूर्ण श्रद्धांजली

अभिवादक

## आत्मा मालिक ध्यानयोग मिशन

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण

* प्रेषक *

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१